admn 20-21


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

MCAER
कृषि परिषद

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद
२००८-२००९

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com संकेतस्थळ : www.mcaer.org दूरध्वनी (०२०) २५५२८६८८


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/ १६५८ दि. ५ सप्टेंबर,२०२०

## परिपत्रक

**विषयः- कृषी व संलग्न विद्याशाखेच्या सन २०२०-२१ मधील पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया तात्पुरती स्थगित करणेबाबत.**

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया दि. १०/९/२०२० पासून चालू आहे. याअंतर्गत नियोजित वेळापत्रकानुसार दि. ५/१०/२०२० रोजी तात्पुरती गुणवत्ता यादी प्रसिध्द करावयाची आहे.

कृषी व पदुम विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण १५१४/ प्र.क्र.१००/ ७ अे, दि.८/७/२०१९ ला अनुसरून सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्गाकरिता उक्त प्रवेश प्रक्रियेमध्ये १२ टक्के जागा आरक्षित करण्यात आलेल्या आहेत. तथापि, मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. ९/९/२०२० रोजी सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्गाच्या आरक्षणास अंतरिम स्थगिती दिली असल्याने यासंदर्भात कृषी परिषदेच्या दि.१०/९/२०२० रोजीच्या पत्रान्वये शासनाकडून मार्गदर्शन मागविण्यात आले होते.

यास अनुसरून शासनाकडून प्राप्त झालेल्या सूचना विचारात घेता, सर्व पदव्युत्तर महाविद्यालये व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश अर्ज सादर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांना या परिपत्रकाद्वारे अवगत करण्यात येते की, याविषयी सामान्य प्रशासन विभाग आणि विधी व न्याय विभागाकडून अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर पदव्युत्तर अभ्यासक्रमाची तात्पुरती गुणवत्ता यादी व त्यापुढील प्रक्रिया राबविण्यात येईल.

यास्तव दि. ५/१०/२०२० पासून पुढील होणारी सन २०२०-२१ मधील पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्यात येत आहे.

(विश्वजीत माने)
**महासंचालक**

प्रति,

१. कुलसचिव / अधिष्ठाता (कृषी), सर्व कृषी विद्यापीठे
२. चारही कृषी विद्यापीठांतर्गत सर्व पदव्युत्तर महाविद्यालये.
३. मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., तिसरा मजला, गोपाळ हाऊस, हॉटेल किमयाजवळ, कर्वे रोड, कोथरुड,पुणे यांना सूचित करण्यात येते की, सदर परिपत्रक प्रवेश प्रक्रियेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावे.
४. मे. मिटू स्किलोजिस्, दुसरा मजला, रत्नतारा कॉम्प्लेक्स, क्रांती चौक, नवी सांगवी, पुणे ४११०४७ यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.

प्रत माहितीसाठीः-

उपसचिव (कृषी विद्यापीठे), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई